३५

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८**
**अ प्रभाग समिती**
**सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक ०8]**

**दिनांक : 10/12/2019** **वेळ : सकाळी 11.30 वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे डिसेंबर **2019 ची** मासिक सभा मंगळवार दिनांक **10/12/2019** रोजी सकाळी **11.30 वा.** अ क्षेत्रीय कार्यालयातील **" राजमाता जिजाऊ सभागृह"** येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.शर्मिला राजू बाबर | सभापती |
| 2. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सदस्या |
| 3. | मा.केशव हनुमंत घोळवे | सदस्य |
| 4. | मा.तुषार रघुनाथ हिंगे | सदस्य |
| 5. | मा.मिनल विशाल यादव | सदस्या |
| 6. | मा.अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 7. | मा.कदम सुनिल मानसिंग | स्वीकृत सदस्य |
| 8. | मा. कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |
| 9. | मा.प्रेमकुमार उर्फ बाबू नायर | महापालिका स्वीकृत सदस्य |

याशिवाय मा.श्रीमती आशादेवी दुरगुडे- क्षेत्रिय अधिकारी, मा. श्री ज्ञानदेव जुंधारे-कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा.श्री. संजय खाबडे-कार्यकारी अभियंता (विद्युत), मा.श्री प्रशांत पाटील-कार्यकारी अभियंता(जलनि:स्सारण), मा.श्री वामन नेमाणे-प्रशासन अधिकारी, मा.श्री मोहन निकम-लेखाधिकारी, मा.श्री महादेव शिंदे, सहाय्यक आरोग्याधिकारी, मा.श्री शिवाजी चौरे-उपअभियंता(स्थापत्य), मा.श्री नरोटे सुनिलदत्त्-उपअभियंता (स्थापत्य् उदयान) मा.श्रीमती मोमीन झेड.आय.-उपअभियंता(झोनिपु स्थापत्य्),मा.श्री मोहन इश्वरा खोंद्रे-उपअभियंता(झोनिपु स्थापत्य्), मा. श्री. एस.पी. काळे-उपअभियंता(ड्रेनेज), मा.श्री डी.एम.कुंभार-उपअभियंता(पाणीपुरवठा) मा.श्री साळवी प्रकाश-उपअभियंता(नगररचना) मा.श्री पी.एम.गायकवाड-उद्यान अधिक्षक, श्री सरवदे हनुमंत-कार्यालय अधिक्षक(अतिक्रमण),श्री कुंभार प्र.गो.-कनिष्ठ अभियंता(नगररचना), श्री शेमले आर.एच.कनिष्ठ अभियंता(पाणी पुरवठा), श्रीमती साळुंके अस्मिता-कनिष्ठ अभियंता-स्थापत्य् उद्यान, इ.अधिकारी/ कर्मचारी बैठकीस उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. सभापती, शर्मिला राजू बाबर यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

सभेचे सुरुवातीस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता कै.एकनाथ पाटील यांचे दुख:द निधन झाल्याने तसेच दापोडी येथील जलनि:स्सारण वाहिनीचे खोदाकाम करीत असताना कै. नागेश जमादार,मजूर यांचे अपघाती मृत्यू झाल्याने तसेच सदरचे कामकाजामध्ये मदतकार्य करीत असतांना मनपाचे अग्निशमन विभागाचे कर्मचारी कै.विशाल जाधव यांचा अपघाती मृत्यू झाल्याने तसेच कै.प्रियांका रेड्डी,हैद्राबाद यांचा मृत्यू झाल्याने त्यांना सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करणेत आली.

यानंतर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नवनिर्वाचित महापौर मा.सौ.उषा(माई) मनोहर ढोरे यांचे मा.अध्यक्षा शर्मिला राजू बाबर यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करणेत आले. तसेच नवनिर्वाचित उपमहापौर मा.श्री तुषार रघुनाथ हिंगे यांचे मा.महापौर यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन करणेत आले. यानंतर बैठकीचे कामकाज सुरु करणेत आले.

---

**कार्यपत्रिका क्रमांक ०६ दिनांक १३/११/२०१९ रोजी स.११.१५ वा.झालेल्या अ प्रभाग समिती सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत असलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

**कार्यपत्रिका क्रमांक ०७ दिनांक १३/११/२०१९ रोजी स.११.३० वा.झालेल्या अ प्रभाग समिती सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत असलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्रमांक ३:-** सन्मा.सभापती शर्मिला बाबर यांचा दिनांक ९/१२/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

म.अ प्रभाग समिती सदस्यांना स्वच्छ भारत अभियान अंतर्गत जयपूर,उदयपूर(राजस्थान) महानगरपालिकेने राबविलेल्या विविध योजना व प्रकल्पांची पाहणी अभ्यास दौरा दि.३०/०१/२०२० ते दि.०३/०२/२०२० या कालावधीत करणेस मान्यता देणे.

---

सभेत खालीलप्रमाणे ठराव मंजूर करणेत आले.

ठराव क्रमांक 19
दिनांक- 10/12/2019
सुचक: : मा.अनुराधा गोरखे

विषय क्रमांक 1
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक: मा.शर्मिला बाबर

संदर्भ: मा.उपमहापौर यांचेकडील पत्र क्र.उपमहापौर/कावि/७६/२०१९ दि.२८/११/२०१९ रोजीचे पत्र.

पिंपरी चिंचवड शहरातील सर्व्हे नं.३०१ बर्डव्हॅली मधील HDFC कॉलनी शेजारील गाळे सद्यस्थितीत रिकामे आहेत. प्रभागातील खालील स्थानिक नागरिकांना सदरचे गाळे ११ महिन्याच्या मुदतीवर भाडे तत्वावर चालविणेस देणेबाबतचे विषयावर चर्चा झाली.

१.संदिप बाबुराव मोरे-विद्यानगर    २. संभाजी बळीराम नाईकनवरे- विद्यानगर
३.राम वसंत बसवणे-विद्यानगर    ४. निलेश विनायक भिगवणकर-विद्यानगर
५.शबाना खदीर शेख-विद्यानगर    ६.सोमनाथ अशोक मोहिते-विद्यानगर
७.गंगा रामराज भेडेकर-दत्तनगर    ८.बाळू विष्णू लोंढे-दत्तनगर
९.धरम भिमाशंकरवाघमारे-दत्तनगर    १०.मोहमंद सुलेमान घाची-आण्णसाहेब मगर
११.अमोल कुचेकर-दत्तनगर    १२.प्रविण शिंदे-शाहूनगर
१३.किरण वेताळकर-दत्तनगर    १४.नितीन दातीर-विद्यानगर
१५आशा गायकवाड-संभाजीनगर    १६ नरेंद्र राजपुत-संभाजीनगर
१७.इरफान सुलेमान शेख-विद्यानगर

उपरोक्त विषयाबाबत सांगोपांग चर्चा झाली असता, सर्व्हे नं.३०१ बर्डव्हॅली मधील HDFC कॉलनी शेजारील गाळयांचे सद्यस्थितीबाबत माहिती घेऊन पुढील बैठकीचे वेळी माहिती अवगत करावी असे सांगून सदरचा विषय माहे जानेवारी २०२० चे मासिक सभेपर्यंत तहकूब ठेवण्याचे सर्वानुमते ठरले.

विषय सर्वानुमते तहकूब करणेत आला.

ठराव क्रमांक 20
दिनांक 10/12/2019
सुचक: मा. अनुराधा गोरखे

विषय क्रमांक 2
विभाग : सन्मा.सदस्याचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ:- सन्मा. सदस्या अनुराधा गणपत गोरखे यांचा दिनांक २८/११/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरातील सर्व्हे नं.३०१ बर्डव्हॅली मधील HDFC कॉलनी शेजारील गाळे सद्यस्थितीत रिकामे आहेत. प्रभागातील खालील स्थानिक नागरिकांना सदरचे गाळे ११ महिन्याच्या मुदतीवर भाडे तत्वावर चालविणेस देणेबाबतचे विषयावर चर्चा झाली.

१. अमोल कुचेकर-दत्तनगर  २. प्रवीण शिंदे- शाहूनगर

३. किरण वेताळकर-दत्तनगर  ४. नितीन दातीर- विद्यानगर

५. आशा गायकवाड-संभाजीनगर  ६. नरेंद्र राजपूत- संभाजीनगर  ७. इरफान सुलेमान शेख-विद्यानगर

उपरोक्त विषयाबाबत सांगोपांग चर्चा झाली असता, सर्व्हे नं.३०१ बर्डव्हॅली मधील HDFC कॉलनी शेजारील गाळयांचे सद्यस्थितीबाबत माहिती घेऊन पुढील बैठकीचे वेळी माहिती अवगत करावी असे सांगून सदरचा विषय माहे जानेवारी २०२० चे मासिक सभेपर्यंत तहकूब ठेवण्याचे सर्वानुमते ठरले.

विषय सर्वानुमते तहकूब करणेत आला.

ठराव क्रमांक 21  विषय क्रमांक 3

दिनांक 10/12/2019  विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा. अनुराधा गोरखे  अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ:- सन्मा. सभापती शर्मिला राजू बाबर यांचा दिनांक ९/१२/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

अ प्रभाग समिती सदस्यांना स्वच्छ भारत अभियान अंतर्गत जयपूर, उदयपूर(राजस्थान) महानगरपालिकेने राबविलेल्या विविध योजना व प्रकल्पांची पाहणी व अभ्यास करुन त्याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये त्यातील चांगल्या योजना व प्रकल्पांची अंमलबजावणी करणेचे दृष्टीने अ क्षेत्रिय समिती सदस्य व महानगरपालिकेचे अधिकारी यांचेकरिता जयपूर उदयपूर(राजस्थान) महानगरपालिका येथे पाहणी करणेकामीचे दौ-यास व होण-या खर्चास प्रभाग समितीची मान्यता देणेत येत आहे. तसेच त्यासाठी येणा-या खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेकामी विषय कायम होणेची वाट न पाहता सदरचा विषय मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती- शर्मिला राजू बाबर, अ प्रभाग समिती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी/अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[ शर्मिला राजू बाबर ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक:- अक्षेका/9/कावि/ 168 /2019 दिनांक:- 20 /12/2019

(वामन नेमाणे)
प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती, निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित -----------------------